सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५) पुणे यांचे कार्यालय**
**स.नं. ४६, बॉम्बे सॅपर्स कॉलनी, कृष्णा प्लाझा, नगर रोड, वडगांव शेरी, पुणे**

दुरध्वनी क्रमांक ०२०-२७०३०७५५ ईमेल - drcspune5@gmail.com

जा.क्रं.उनि(५)/गृह/महा.पो.मेगासिटी/क.७७अ/नोटीस/सन २०२२/२८०३ दिनांक :- २३/०२/२०२२

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये नोटीस)**

**वाचले :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुद
२. मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालयाकडील जा.क्र. रासनिप्रा/कक्ष४/क वर्ग १३सं/निनिअ नियुक्ती पुणेशहर ५/४०२३/२०२१ दि.२२/११/२०२१ रोजीचे आदेश.
३. या कार्यालयाकडील दिनांक ०३/१२/२०२१ अन्वये मंजूर केलेला निवडणुक कार्यक्रम
४. श्री सुनिल धादवड, निवडणुक निर्णय अधिकारी, महाराष्ट्र पोलिस मेगासिटी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, लोहगांव, पुणे यांनी या कार्यालयास दि. ०४/०१/२०२२ रोजी सादर केलेला अहवाल
५. या कार्यालयाकडील दि.०७/०१/२०२२ अन्वये महा.सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-१९(१) अन्वये समिती गठीत केलेबाबत निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना.
६. संस्थेने दि.११/०२/२०२२ रोजीचे संचालक मंडळ सभेतील सादर केलेला ठराव.

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर (५), पुणे

ज्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, लोहगांव गंगा कॉम्प्लेक्स फ्लॅट नं १ पहिला मजला, विमानतळ रोड, ता. हवेली, जि. पुणे ही नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकारकक्षेत येत असून तिचा नोंदणी क्रमांक पीएनए/पीएनए(४)/एचएसजी/(टीसी)/ १३४२/२०१०-११, दि.०७/०८/२०१० असा आहे. आणि,

ज्याअर्थी, सदर संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१, संस्थेचे मंजूर उपविधी तसेच शासन व मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, परिपत्रके तसेच दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार चालविणे सदर संस्थेच्या संचालक मंडळावर बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र.२ अन्वये उक्त संस्थेची संस्थेच्या सन २०२१-२२ ते २०२६-२०२७ या कालावधीसाठी संचालक मंडळ निवडणुकीसाठी श्री सुनिल धादवड यांची निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली होती.आणि,

ज्याअर्थी,वाचले क्र.३ अन्वये संस्थेचा सन २०२१-२२ ते २०२६-२०२७ या कालावधीसाठीचा संचालक मंडळ निवडणुक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आलेला होता.आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र.४ अन्वये निवडणुक निर्णय अधिकारी यांनी सदर संस्थेचा अविरोध निवडणुक निकाल या कार्यालयास सादर केलेला होता.आणि,

ज्याअर्थी, वाचले क्र.५ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ब-१९ अन्वये संस्थेची सर्व १९ पदे अविरोध निवडून समिती गठीत केलेबाबत अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली होती.आणि,

ज्याअर्थी, सदर संस्थेच्या नवनिर्वाचित १९ समिती सदस्यांपैकी ११ समिती सदस्य यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने नवनिर्वाचित समिती सदस्य यांनी दि.११/०२/२०२२ रोजीचे संचालक मंडळ सभेत १३ संचालकांचे उपस्थितीत ११ समिती सदस्य यांनी दिलेले राजीनामे मंजूर करुन ठराव पारीत केलेला आहे.आणि,



Scanned with CamScanner

ज्याअर्थी, संस्थेच्या १९ समिती सदस्यांपैकी ११ समिती सदस्य यांनी राजीनामा दिल्याने संस्थेच्या उपविधीनुसार आवश्यक गणपूर्ती होत नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(ब-१) अन्वये गणपूर्ती अभावी संस्थेच्या समितीच्या रचनेमध्ये दोष निर्माण होवून व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदीप्रमाणे संस्थेच्या समितीच्या रचनेमध्ये दोष निर्माण झाल्यास व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाल्यास निबंधकास सदर अधिनियमातील कलमाव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करण्याचे अधिकार आहेत. आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळातील १९ पैकी ११ समिती सदस्य यांनी राजीनामा दिल्याने संस्थेचे व्यवस्थापन पाहण्यासाठी संस्थेच्या सभासदांमधून त्रिसदस्यीय प्राधिकृत अधिकारी समिती किंवा पॅनलवरील प्राधिकृत अधिकारी नेमणे आवश्यक असलेची माझी खात्री पटलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ मधील तरतुदीन्वये सदर आदेश जारी करण्यापूर्वी त्याची नोटीस जाहीर करावयाची आवश्यकता आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये खालीलप्रमाणे नोटीस जारी करत आहे.

## -नोटीस-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी निलम पिंगळे, उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे शहर (५), पुणे या नोटीसी अन्वये महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी गृहरचना संस्था मर्या., लोहगांव गंगा कॉम्प्लेक्स् फ्लॅट नं १ पहिला मजला, विमानतळ रोड, ता. हवेली, जि. पुणे या संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाल्याचे अनुमानित करून संस्थेच्या सभासदांमधून तीन सदस्यीय प्राधिकृत अधिकारी समितीची नियुक्ती करण्याची आवश्यकता असल्याने त्याबाबत संस्थेच्या सभासदांचे कोणतेही आक्षेप वा सुचना असल्यास तसेच दैनंदीन कामकाज पाहणेसाठी संस्थेचे त्रिसदस्यीय समितीत प्राधिकृत अधिकारी म्हणून काम करण्यास तयार संस्थेचे पात्र सभासद यांनी सदर नियुक्तीसाठी त्यांच्या पात्रतेबाबत लेखी सत्यापनासह लेखी संमती सदर नोटीसीच्या तारखेपासून सात दिवसाच्या आंत या कार्यालयास कळवावे. विहीत मुदतीत पात्रतेचे सत्यापनासह लेखी संमतीपत्रे प्राप्त न झाल्यास अथवा संमती प्राप्त झालेल्या प्रस्तावांपैकी निबंधकाच्या मते कायद्यानुसार सदर नियुक्तीसाठी ते पात्र नसल्यास निबंधकास योग्य वाटतील अशा व्यक्ती / व्यक्तींची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल. अशा समितीची प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती ते पद धारण केल्यापासुन ६ महिनेपर्यंत राहील परंतु तत्पुर्वी ते संस्थेच्या नवीन व्यवस्थापकीय समितीची निवडणूक घेण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करतील.

प्रस्तुतची नोटीस आज दिनांक २३/०२/२०२२ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर (५), पुणे

( निलम पिंगळे )
उपनिबंधक,
सहकारी संस्था,पुणे शहर(५) पुणे.

प्रत-

१. श्री दिपक मुंडे, प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरिक्षक

२/- त्यांना आदेशित करण्यात येते की, सदर नोटीस संस्थेच्या नोटीसबोर्डवर प्रसिद्ध करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. संस्थेच्या नोटीसबोर्डवर जाहीर प्रसिद्धीकरता.

उपनिबंधक,
सहकारी संस्था,पुणे शहर(५) पुणे.

Scanned with CamScanner